**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित.**
एस्ट्रेला बॅटरीज एक्स्पॅन्शन कंपाऊंड इमारत, तळमजला,
लेबर कॅम्प,धारावी रोड, माटुंगा,मुंबई-४०० ०१९,दूरध्वनी क्र.०२२-६९४२५०००,
ईमेल: agmhrrc@mahagenco.in वेबसाईट : www.mahageco.in

क्र.महानिर्मिती/मासं-से.प्र/रसायनशास्त्रज्ञ संवर्ग/काटिक्र.३२३/ No 05459 दिनांक: 20 JUN 2025

## सूचना

**विषय :- "अतिरिक्त कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ" पदाच्या ऑनलाईन परीक्षेकरीताचे प्रवेशपत्र आणि इतर महत्त्वाच्या सूचना.**

**संदर्भ :-**१.महानिर्मिती जाहिरात क्र.०२/२०२५
२.महानिर्मिती सुधारपत्रक क्र.२४७९ दि.३०.०३.२०२५
३.महानिर्मिती सूचना क्र.३३४३ दि.१६.०४.२०२५
४.महानिर्मिती सूचना क्र.५०१५ दि.०५.०६.२०२५
५.महानिर्मिती सूचना क्र.५४१२ दि.१९.०६.२०२५

---

महानिर्मिती कंपनीतर्फे जाहिरात क्र.०२/२०२५ अन्वये रसायनशास्त्रज्ञ संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाद्वारे भरण्याकरीता जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीस अनुसरुन अतिरिक्त कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ या पदाची ऑनलाईन परीक्षा दि.३०.०६.२०२५ रोजी आयोजित करण्यात आली असल्याबाबत कळविण्यात आले होते.

करिता उमेदवारांनी ऑनलाईन परीक्षा प्रवेशपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी खालील ठिकाणी क्लिक करावे.

| **ऑनलाईन परीक्षेकरीताचे माहितीपत्रक प्राप्त करण्याकरीता येथे क्लिक करावे.** ↵ |
|---|

| **ऑनलाईन परीक्षेकरीताचे प्रवेश पत्र प्राप्त करण्याकरीता येथे क्लिक करावे.** ↵ |
|---|

## सूचना

१) उमेदवारांना सूचित करण्यात येते की, उमेदवारांनी प्रवेशपत्राच्या किमान ०२ प्रती (02 Print outs) काढून घ्याव्यात. उमेदवारांना ज्या वेळी प्रवेशपत्राची मागणी करण्यात येईल, त्या वेळी उमेदवारांजवळ प्रवेशपत्राची प्रत असणे आवश्यक आहे, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

२) उमेदवारांनी ऑनलाईन आवेदन करतेवेळी अर्जात भरलेल्या ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांकावर प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याकरीताचा ई-मेल व संदेश पाठविण्यात आलेला आहे.

३) उमेदवारांनी अर्जात नमुद परीक्षा केंद्रातील पहिल्या पसंतीचे परीक्षा केंद्र बहुतांश उमेदवारांना उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तथापि, काही परीक्षा केंद्रांसाठी जास्त अर्ज प्राप्त झाल्याने अथवा खुपच कमी अर्ज प्राप्त झाल्याने संबंधित परीक्षा केंद्राच्या क्षमतेअभावी अथवा उपलब्धते अभावी उमेदवारांना दुसऱ्या/ तिसऱ्या पसंतीचे परीक्षा केंद्र उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

४) उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करतेवेळी स्वत:च्या नावाबाबत माहिती सादर केली आहे. त्याच नावाचे ओळखपत्र (उदा. मुळ आधारकार्ड, मुळ पॅनकार्ड इ.) सादर करणे आवश्यक आहे. तसेच ओळखपत्र तपासणी करताना कोणतीही तफावत आढळल्यास अशा उमेदवारांना परीक्षा केंद्रामध्ये प्रवेश देण्यात येणार नाही, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

५) ऑनलाईन परिक्षेच्या वेळी परीक्षा कक्षामध्ये किंवा परीक्षा केंद्राच्या परिसरात भ्रमणध्वनी, ब्लूटूथ उपकरणे तसेच इतर संपर्काची साधणे तसेच डिजीटल घड्याळ, कॅलक्युलेटर, स्मॉर्टवॉच इ. उपकरणे वापरण्यास सक्त मनाई आहे. तसेच ऑनलाईन परीक्षेदरम्यान वरील प्रमाणे उपकरणे वापरताना आढळुन आल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरवून त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

६) वरील पदाच्या ऑनलाईन परिक्षेत CCTV/Biometric Captureing इ. सुरक्षा साधनांचा वापर करण्यात येणार आहे, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी. तसेच आवश्यकता भासल्यास CCTV फुटेज व Biometric माहितीच्या आधारे ऑनलाईन परीक्षेच्याअंती तसेच भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर आणि नियुक्ती दिल्यानंतरही कोणताही गैरप्रकार केला असल्याचे आढळुन आल्यास व तसे सिद्ध झाल्यास सदरील उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. तसेच नियुक्ती दिली असल्यास अशा उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यात येईल व सदरील उमेदवाराविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

७) उपरोक्त नमूद सर्व सूचना आणि जाहिरात क्र.०२/२०२५, ऑनलाईन परीक्षेच्या प्रवेश पत्रामध्ये नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती यांचे उमेदवारांनी पुन:श्च वाचन करावे, जेणेकरुन उमेदवारास ऑनलाईन परीक्षेदरम्यान व भरतीच्या पुढील टप्प्यांवर कोणतीही अडचण निर्माण होणार नाही.

८) सर्व उमेदवारांना सूचित करण्यात येते की, ऑनलाईन परीक्षेसाठी परीक्षाकेंद्रावर आपणांस दिलेल्या वेळेच्या किमान ०१ तास अगोदर उपस्थित रहावे. जे उमेदवार परीक्षेच्या विहीत वेळेमध्ये परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणार नाहीत अशा उमेदवारांना परीक्षा केंद्रामध्ये प्रवेश देण्यात येणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

९) उपरोक्त नमुद प्रवेशपत्र व माहितीपत्रकामधील नमुद अटी व शर्तींचे पालन करणे बंधनकारक आहे.

(डॉ.नितीन वाघ)
कार्यकारी संचालक (मासं)
महानिर्मिती

D:\RC_२०१८_DATA\२०२५\Advertisement\०२ २०२५ Chemist\Notification.docx